तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५

आतील पानावर

पान २– अजय आणि संजय दत्तची जोडी...
पान ३– जॅकीदादा दहा वर्षांनी मराठी सिनेमात
पान ४ – साऊथ इंडस्ट्री परंपरांना धरुन असते
पान ५ –'हुप्पा हुय्या २' येणार!
पान ६ – औरंगजेबच्या भूमिकेत दिसणार...



# महाराणी येसूबाईंच्या भूमिकेत रश्मिका

छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा सांगणारा बहुप्रतीक्षित 'छावा' चित्रपट येत्या १४ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाचं औचित्य साधून या चित्रपटाचं पहिलं पोस्टर आणि ट्रेलरची घोषणा 'मॅडॉक फिम्स'कडून करण्यात आली होती. आता नुकताच 'छावा'मधील रश्मिका मंदानाचा पहिला लूक प्रेक्षकांसमोर आला आहे. चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची ऐतिहासिक भूमिका अभिनेता विकी कौशल साकारणार आहे. तर, महाराणी येसूबाई यांच्या भूमिकेत दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना झळकणार आहे. रश्मिकाचा 'छावा' चित्रपटातील पहिला लूक ट्रेलर प्रदर्शनाच्या एक दिवसआधी प्रेक्षकांसमोर रिव्हिल करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी, श्री सखी राज्ञी जयति महाराणी येसूबाई यांची भूमिका साकारण्यासाठी रश्मिकाने प्रचंड मेहनत घेतली आहे. यासाठी मराठी भाषेचं प्रशिक्षण घेतल्याचंही तिने मुलाखतींमध्ये सांगितलं आहे. चेहर्यावर प्रसन्न करुन टाकणार स्मितहास्य, कपाळी कुंकू, नाकात नथ, गळ्यात पारंपरिक ऐतिहासिक दागिने, हातात हिरव्या बांगड्यांचा चुडा असा रश्मिकाचा चित्रपटातील पहिला लूक नुकताच प्रेक्षकांसमोर आला आहे.

रश्मिकाचा मराठमोळा लूक तिच्या लाखो चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. श्री सखी राज्ञी जयती महाराणी येसुबाई सरकार!, आमच्या महाराणी येसूबाईखूपच सुंदर रश्मिका, महाराणी येसूबाई सरकार यांची भूमिका साकारणं ही रश्मिकासाठी अभिमानाची गोष्ट आहे, जय जिजाऊ जय शिवराय अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी या पोस्टवर केल्या आहेत. दरम्यान, बहुप्रतीक्षित 'छावा' चित्रपट १४ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये संतोष जुवेकर, शुभंकर एकबोटे यांसारखे मराठी कलाकार सुद्धा या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकणार आहेत. तर, 'छावा'मध्ये औरंगजेबच्या भूमिकेत अभिनेता अक्षय खन्ना दिसेल.





# अजय आणि संजय दत्तची जोडी पुन्हा एकत्र

हिंदी अभिनेता अजय देवगण आणि संजय दत्त हे दोघेही सिनेसृष्टीतील आघाडीचे कलाकार आहेत. लवकरच अजय 'रेंजर' या चित्रपटात दिसणार आहे. चित्रपट निर्माते लव रंजन आणि जगन शक्ती यांच्या या चित्रपटात अजयला कास्ट करण्यात आले आहे, ज्यामध्ये बॉलिवूडचा 'खलनायक' संजय दत्त त्याच्या अपोझिट भूमिकेत दिसणार आहे. हा एक जंगल ॲडव्हेंचर चित्रपट असणार आहे. अहवालानुसार, चित्रपटाच्या कास्टिंग दरम्यान खलनायकाच्या भूमिकेसाठी उत्तम कलाकार शोधला जात होता. ज्यात संजय दत्त 'खलनायक' भूमिकेत दिसणार असल्याचे म्हंटले जात आहे. या चित्रपटासाठी निर्माते अजय देवगण आणि संजय दत्तचा खास लूक तयार करत आहेत. ज्यामध्ये तो फॉरेस्ट रेंजर किंवा रक्षकाच्या भूमिकेत दिसणार आहे. 'रेंजर'मध्ये नवीनतम व्हीएफएक्स वापरला जाईल. निर्माते २०२५च्या उन्हाळ्यात सिनेमाचे शूटिंग सुरू करण्याचा विचार करत आहेत. 'चित्रपटाच्या प्री- प्रॉडक्शनचे काम अजूनही सुरू आहे. रेंजरमधील दोघांचा आमनासामना मोठ्या पडद्यावर पाहण्यासारखा असणार आहे. 'रेंजर' या चित्रपटाच्या उर्वरित कास्टचा शोध अजूनही चालू आहे. हा चित्रपट केव्हा प्रदर्शित होईल? याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. अजयने 'रेंजर' शूटिंग करण्यापूर्वी 'दे दे प्यार दे २' आणि 'धमाल ४' या दोन चित्रपटांचे शूटिंग पूर्ण केले आहे. या व्यतिरिक्त त्याचा 'रेड २' हा चित्रपट मे महिन्यातही प्रदर्शित होणार आहे. याशिवाय तो 'सन ऑफ सरदार २' मध्येही दिसणार आहे.



# 'त्या' भूमिकांचा मला काहीच फरक पडत नाही

अभिनेत्री तृप्ती डिमरीचं नाव सध्या बॉलिवूडमधील आघाडीच्या नायिकांमध्ये घेतलं जातं. संदीप रेडी वांगा दिग्दर्शित 'ॲनिमल' या सिनेमामुळे तिला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळाली. त्यानंतर तिच्याकडे चित्रपटांची रांग लागली. याशिवाय तिच्या 'आशिकी ३' सिनेमाची सध्या बॉलिवूडमध्ये खूप चर्चा आहे. कार्तिक आर्यन सिनेमात लीड हिरो असणार हे जवळपास निश्चित झालेलं असताना तृप्ती डिमरीचा लीड हिरोईन म्हणून विचार सुरु होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून तृप्तीला यातून हटवण्यात आल्याची चर्चा होती. यामागे तृप्तीने याधीच्या चित्रपटात साकारलेल्या भूमिका कारणीभूत ठरल्याचं म्हटलं जातं आहे. आता या सगळ्या चर्चांवर अभिनेत्रीने भाष्य करत मौन सोडलं आहे. नुकतीच तृप्ती डिमरीने एका मुलाखतीमध्ये अनेक खुलासे केले. या मुलाखतीमध्ये अभिनेत्रीला 'ॲनिमल'आणि 'बॅड न्यूज' सारख्या चित्रपटांमध्ये तिने साकारलेल्या बोल्ड भूमिकांबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्या प्रश्नाचं उत्तर देताना तृप्ती डिमरी म्हणाली, मी माझ्या करिअरमध्ये हेच शिकले की, काही चित्रपट चांगले चालतात तर काही चित्रपटांना यश मिळत नाही. आपण कायमच लोकांना आवडू शकतो, असं काही नाही. मला यामुळे काहीच फरक पडत नाही. मी नेहमीच मनाचा विचार करते. त्यानंतर पुढे ती म्हणाली, उद्या जर तुम्ही मागे वळून पाहिलंत तर एखादी भूमिका साकारल्याचा तुम्हाला पश्चातापही होऊ शकतो. परंतु त्यावेळी तुम्ही तुमचं काम प्रामाणिकपणे केलं होतं. तृप्तीच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर तिने लैला मजनू, ॲनिमल, बॅड न्यूज आणि भुल भूलैय्या-३ या चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

# ...अन् चित्रपटांमधून मला बाहेर काढलं



'दंगल', 'लुडो', 'अजीब दास्ताँ' आणि 'ठग्स ऑफ हिंदुस्तान' या चित्रपटांमधून लोकप्रियता मिळवलेली अभिनेत्री म्हणजे फातिमा सना शेख. 'दंगल' या सिनेमात तिने गीता फोगटची भूमिका निभावली, तिच्या या कामाचं सगळ्यांनी भरभरुन कौतुक केलं. यानंतर अभिनेत्रीने 'ठग्स ऑफ हिंदुस्तान' चित्रपटात आमिर खानसोबत एकत्र काम केलं. परंतु हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. त्याचा परिणाम फातिमाच्या फिल्मी करिअरवर झाला, त्यामुळे अभिनेत्रीला असंख्य अडणींचा सामना करावा लागला होता. याबद्दल तिने एका मुलाखतीत खुलेपणाने भाष्य केलं आहे. नुकतीच फातिमा शेखने एक मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये तिने आपल्या संघर्षकाळावर भाष्य केलं आहे. त्यावेळी मुलाखतीमध्ये अभिनेत्री म्हणाली, एक दिग्दर्शक म्हणून पाहायचं झालं तर, एखादा सिनेमा जर फ्लॉप झाला तर त्यांच्यासाठी दुसरा सिनेमा बनवणं कठीण असतं. कलाकारांच्या बाबतीत सुद्धा असंच घडतं. तुम्हाला काही चित्रपटांमधून रिजेक्ट करण्यात येतं. हे माझ्यासोबत घडलं आहे. 'ठग्स ऑफ हिंदुस्तान' फ्लॉप झाल्यानंतर मला दोन चित्रपटांमधून बाहेर काढलं. पण, मी या गोष्टींकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिलं. निर्मात्यांचा हा निर्णय त्यांच्या दृष्टीने योग्यच होता. दरम्यान, फातिमा सना शेख हिने 'चाची ४२०' या सिनेमातून कलाविश्वात पदार्पण केलं आहे. या सिनेमात तिने भारतीची (तब्बूच्या तरुणपणीची) भूमिका साकारली होती. त्यानंतर ती २०१६ मध्ये दंगल या सिनेमात मुख्य भूमिकेत झळकली. फातिमा गेल्यावर्षी 'सॅम बहादुर' सिनेमात दिसली. तसंच तिचा 'धक धक' सिनेमाही आला. यानंतर अद्याप ती कोणत्याही सिनेमात लीड रोलमध्ये दिसलेली नाही.

# नवाझुद्दीन सिद्दीकी दिसणार पोलिसाच्या भूमिकेत



अभिनेता नवाझुद्दीन सिद्दीकीच्या 'रात अकेली है' चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. यानंतर आता 'रात अकली है' च्या दुसर्‍या भागाच्या शुटींगला सुरुवात झाली आहे. या चित्रपटाचे शुटींग दिल्लीत सुरू असून यात नवाझुद्दीन पुन्हा पोलिसाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाची कथा एका छोट्या शहरातील पोलीस अधिकाऱ्यांची आहे, इन्स्पेक्टर जलीत यादव जो एका वृद्ध सदस्याच्या मृत्यूच्या चौकशीत गुंततो. पहिल्या भागातील थरारनंतर प्रेक्षकांना दुसऱ्या भागाची अधिक उत्सुकता लागली आहे. तसेच, दिग्दर्शक हनी त्रेहान आणि लेखक दिनेश विजय यांनी या चित्रपटाच्या कथेला एक नवा दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या भागात नवाजुद्दीन सिद्दिकी, राधिका आपटे, श्वेता त्रिपाठी आणि इतर कलाकारांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. सिक्वेलमध्ये कोणते कलाकार पाहायला मिळणार हे अद्याप समोर आलेले नाही.

नवाजुद्दीनच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचं तर, रात अकेली है २ व्यतिरिक्त तो लवकरच मॅडॉक फिल्म्सच्या 'थामा' मध्ये देखील दिसणार आहे. या चित्रपटात रश्मिका मंदान्ना आणि आयुष्मान खुराना मुख्य भूमिकेत आहेत. नवाजुद्दीनचे सरफरोश, मुन्ना भाई एमबीबीएस, गँग्स ऑफ वासेपूर, द लंचबॉक्स, किक, बजरंगी भाईजान आणि रईस हे चित्रपट सुपरहिट ठरले.

## जॅकीदादा १० वर्षांनी मराठी सिनेमात



अभिनेता जॅकी श्रॉफ हे बॉलीवूडचे दिग्गज अभिनेते आहे. सध्या आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम टप्पा अनुभवणाऱ्या ६७ वर्षीय जॅकी यांनी अनेक सिनेमांत उत्तम अभिनय केला आहे. गेल्या वर्षी त्यांनी 'सिंघम अगेन' आणि 'बेबी जॉन' या दोन्ही चित्रपटांमध्ये खलनायकाची भूमिका साकारली. २०२५ ची सुरुवात त्यांनी 'चिडीया उड' या वेब सीरिज मधील आणखी एका नकारात्मक भूमिका केली. आणि आता, जॅकी फक्त बॉलीवूड किंवा दक्षिणेतच नव्हे तर मराठी सिनेसृष्टीतही काम करणार आहेत.

यावर्षी जॅकी श्रॉफ यांचा एक मराठी चित्रपट प्रदर्शित होणार असून, ते तब्बल दहा वर्षांनंतर मराठी चित्रपटसृष्टीत पुनरागमन करणार आहेत. जॅकी यांचा शेवटचा मराठी चित्रपट 'शेगावीचा योगी गजानन' २०१५ मध्ये प्रदर्शित झाला होता. मात्र, २०२४ मध्ये त्यांना एका वेगळ्या धाटणीच्या स्क्रिप्टची ऑफर मिळाली, ही स्क्रिप्ट त्यांना खूप आवडली. त्यांनी या चित्रपटाचं शूटिंग पूर्ण केलं आहे आणि आता प्रदर्शित होण्याची वाट पाहत आहेत.

या चित्रपटात शरद केळकर यांचीही मुख्य भूमिका आहे. यापूर्वी जॅकी आणि शरद यांनी २००४ च्या 'हलचल' या चित्रपटात एकत्र काम केले होते.



# बाळासाहेब ठाकरेंचा नातू बॉलीवूडमध्ये करणार पदार्पण

दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा नातू लवकरच सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. जयदेव ठाकरे व स्मिता ठाकरे यांचा मुलगा ऐश्वर्य ठाकरे बॉलीवूड पदार्पणासाठी तयार आहे. तो अनुराग कश्यपच्या चित्रपटातून सिनेविश्वात पहिलं पाऊल ठेवणार आहे. त्याच्या पहिल्यावहिल्या चित्रपटाबद्दल मोठी माहिती समोर आली आहे. कौटुंबिक पार्श्वभूमी राजकारणाची असली तर ऐश्वर्यला मात्र राजकारणात जायचं नाही. त्याला सिनेविश्वात काम करायचं आहे. ऐश्वर्य ठाकरे चित्रपट निर्माता अनुराग कश्यपबरोबर काम करून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. ऐश्वर्य व अनुराग कश्यप यांच्या या आगामी प्रकल्पाबद्दल मोठी माहिती समोर आली आहे. माहितीनुसार, प्रत्येक मीटिंगमध्ये अनुराग व ऐश्वर्य यांचा चित्रपट हा चर्चेचा मुख्य विषय असतो. हा चित्रपट इंडस्ट्रीतील प्रोडक्शन हाऊसमध्ये सर्वाधिक चर्चेत असलेला प्रोजेक्ट आहे. ऐश्वर्यने २०१५ मध्ये संजय लीला भन्साळी यांच्या 'बाजीराव मस्तानी' या चित्रपटातून आपल्या करिअरची सुरुवात केली होती. तेव्हा त्याने सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केलं होतं. या चित्रपटात काम करताना तो दिग्दर्शनातील बारकावे व त्याचबरोबर अभिनयही शिकला. अभिनयात पदार्पण करण्यासाठी सज्ज असलेला ऐश्वर्य उत्तम डान्सर आहे. तो मायकल जॅक्सनला प्रेरणास्थान मानतो, असं म्हटलं जातं. ऐश्वर्य लवकरच मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. पहिलाच प्रोजेक्ट त्याला अनुराग कश्यपबरोबर मिळाला आहे, त्यामुळे त्याच्या या चित्रपटाची बरीच चर्चा आहे. राजकारणाऐवजी अभिनयक्षेत्र निवडणारा ऐश्वर्य आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकतो की नाही, ते येत्या काळातच कळेल. ऐश्वर्य ठाकरे हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा पुतण्या आहे. तसेच तो आदित्य ठाकरे व तेजस ठाकरे यांचा चुलत भाऊ आहे. ऐश्वर्य सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तो त्याचे फोटो व डान्स व्हिडीओ शेअर करत असतो. त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर आजोबा बाळासाहेब ठाकरे यांच्याबरोबरचे अनेक फोटो आहेत.



## साऊथ इंडस्ट्री परंपरांना धरून असते

रहना है तेरे दिल मे, तनू वेड्स मनू या सिनेमांमधून तरुणांना प्रेमात पाडणारा अभिनेता आर माधवन. त्याच्या अभिनयाचं नेहमीच कौतुक होतं. साऊथमधील अनेक भाषांमध्ये त्याने काम केलं आहे. तसंच बॉलिवूडमध्येही त्याचं वेगळं स्थान आहे. दरम्यान, हिंदी आणि साऊथ अशा दोन्ही इंडस्ट्रीत काम करताना काय फरक जाणवतो यावर नुकतंच माधवनने उत्तर दिलं आहे. एका मुलाखतीत आर माधवन म्हणाला, हिंदी, तेलुगू किंवा मल्याळम कोणतीही इंडस्ट्री असो त्या- त्या नुसार तिथल्या परिभाषा या बदलतातच. बॉलिवूड खूप जास्त श्रेष्ठ झाला आहे जेव्हा की तेलुगु फिल्म इंडस्ट्री अजूनही आपल्या मूळाशी घट्ट बांधलेली आहे. त्यांच्या सिनेमांमध्ये परंपरांची झलक दिसते. एस एस राजामौली यांच्या सिनेमांचंच उदाहरण घ्या. त्यांचेही सिनेमे जमिनीशी जोडलेले असतात. छोट्या शहरांच्या इतिहासाची यात झलक दिसते. ते बाहुबली, आर आर आर किंवा पुष्पासारखे सिनेमे बनवण्यासाठी खूप पैसे लावतात. या गोष्टींच्या चित्रीकरणासाठी आणि त्यांना मजबूत बनवण्यासाठी आपला जीव झोकून काम करतात. मल्याशम इंडस्ट्रीबद्दल मॅडी म्हणाला, गेल्या काही वर्षात मल्याळम इंडस्ट्री खूप पुढे गेली आहे. कंटेंट आणि भूमिकांवर फोकस करण्यात इंडस्ट्री यशस्वी ठरली आहे. मर्यादित बजेटचेही सिनेमे कमाल प्रदर्शन करत आहेत. तेलुगूमध्ये तरी बिग बजेट सिनेमे यातात जे फ्लॉप होतात ही देखील एक वास्तविकता आहे. इंडस्ट्रीत सध्या बरेच कायापालट होत आहेत. लवकरच नवीन कंटेंट आणि वेगळं काहीतरी पाहून प्रेक्षकही अवाक होतील.

## 'जन नायगन' चित्रपटाचा फर्स्ट लूक समोर



अभिनेता आणि नेता थलपती विजयचा शेवटचा चित्रपट 'थलपती ६९'च्या निर्मात्यांनी फर्स्ट लूक पोस्टर रिलीज केला आहे. एच.विनोद यांच्या दिग्दर्शनाखाली हा चित्रपट बनला असून या चित्रपटाचे नाव 'जन नायगन' ठेवण्यात आले आहे. निर्मात्यांनी केवीएन प्रॉडक्शनच्या अधिकृत द हँडलवर विजय थलपतीच्या सिनेमाचे पोस्टर शेअर केले आहे. निर्मात्यांनी पोस्टरसोबत कॅप्शनमध्ये लिहिले की, आम्ही याला जन नायगन, थलपथी ६९ फर्स्ट लूक म्हणत आहोत. 'जन नायगन'च्या फर्स्ट लूक पोस्टरमध्ये थलपती विजय एका उंच स्टेजवर आत्मविश्वासाने उभा राहून समर्थकांच्या गर्दीसोबत सेल्फी घेताना दिसत आहेत. थलपती विजयच्या शेवटच्या चित्रपटाचे शूटिंग गेल्या वर्षी पारंपारिक पूजा समारंभाने सुरू झाले. चित्रपटाच्या निर्मात्यांनी त्यांच्या द हँडलवर कलाकार आणि क्रू मेंबर्ससह अनेक चित्रे शेअर केली होती. सुपरस्टार थलपथी विजयच्या शेवटच्या चित्रपटाच्या नावाचा अर्थ जननायक असा आहे. पारंपारिक पूजा समारंभात थलपथी विजय, बॉलिवूड अभिनेता बॉबी देओल आणि पूजा हेगडे आणि इतर कलाकार आणि क्रू सदस्य उपस्थित होते. या चित्रपटाचे शूटिंग नवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी सुरू झाले.

थलपती विजयचा 'जन नायगन' सिनेमा १७ ऑक्टोबर रोजी तमिळ, तेलुगू तसेच हिंदीमध्ये प्रदर्शित होणार आहे. थलपती विजय 'जन नायगन'मध्ये अभिनेत्री पूजा हेगडेसह बॉबी देओल, गौतम वासुदेव मेनन, प्रकाश राज, नारायण, प्रियमणी, ममिता बैजू, मोनिशा ब्लेसी आणि वरलक्ष्मी सरथकुमार यांच्यासह इतर कलाकार महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.



## समंथा 'रक्त ब्रम्हाड'मध्ये दिसणार ॲक्शन करताना

दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा प्रभू हि राज आणि डीके यांनी दिग्दर्शित केलेल्या सिटाडेल या वेब सीरिजमध्ये दिसली होती. या सिरीजमध्ये समंथाने ॲक्शन सीन केले होते. आता पुन्हा एकदा एका नव्या सिरीजमध्ये समंथा ॲक्शन करताना दिसणार आहे. तिच्या नव्या सिरीजचे नाव रक्त ब्रम्हाड असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता समंथाची नवी ॲक्शन सिरीज रक्त ब्रम्हांड कधी रिलीज होणार याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. समंथाला सिटाडेल या वेबसिरीजमधील भूमिका प्रेक्षकांना खूप आवडली होती. आता पुन्हा एकदा रक्त ब्रम्हाड या नव्या सिरीजमधील समंथाच्या रोल काय असणार याची देखील उत्सुकात तिच्या चाहत्यांना लागलेली आहे. समंथा रुथ प्रभूने काही काळापूर्वी शूटिंगमधून ब्रेक घेतला काही खास वेळ एकटीने घालवण्यासाठी ती परदेशात गेली होती. काल समंथा मुंबईत परतली असून रक्त ब्रम्हांडच्या शूटिंमध्ये सहभागी झाली आहे. तथापि, तेलुगूमध्ये, तिने अद्याप तिच्या पुढील चित्रपटाची घोषणा केलेली नाही आणि आगामी काळात ती तिच्या चाहत्यांसाठी कोणता विशेष प्रोजेक्ट घेऊन येत आहे याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. समंथाने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये तिने तिच्या काही फोटोंना कॅप्शन दिले आहे, मी गेल्या दोन वर्षांपासून या छोट्याशा विधीचा सराव करत आहे आणि यामुळे मला माझ्या काही कठीण क्षणांचा सामना करण्यास मदत झाली आहे. मी कुठे होते, कुठे आहे आणि पुढे काय होणार आहे. आज तुम्ही ज्या तीन गोष्टींसाठी कृतज्ञ आहात ते लिहा- त्या मोठ्या असण्याची गरज नाही, फक्त प्रामाणिक राहा. पण लिहिणे अवघड वाटत असेल तर तेही ठीक आहे. काहीवेळा, मनात फक्त धन्यवाद घेऊन बसणे पुरेसे असते असे पोस्टमध्ये तिने लिहिले आहे.

# 'हुप्पा हुय्या २' येणार!

'हुप्पा हुय्या' म्हटलं की 'जय बजरंगा' अशी गर्जना आपसूकच तोंडून निघते. तब्बल १५ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर बॉक्स ऑफिसवर गाजलेल्या आणि प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान मिळवलेल्या 'हुप्पा हुय्या' चित्रपटाचा सिक्वेल लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दिग्दर्शक समित कक्कड यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून 'हुप्पा हुय्या २' ची अधिकृत घोषणा करत चाहत्यांची उत्सुकता वाढवली आहे. पहिल्या भागातील दमदार कथेने आणि त्यातील व्हीएफएक्सच्या उत्कृष्ट वापराने प्रेक्षकांना भुरळ घातली होती. मारुतीरायाने दिलेल्या शक्तीचा गावासाठी उपयोग करणाऱ्या हणम्याची ही गोष्ट अजूनही प्रेक्षकांच्या आठवणीत आहे आणि हीच आठवण पुन्हा ताजी करण्यासाठी दिग्दर्शक समित कक्कड यांचा 'हुप्पा हुय्या २' रसिक प्रेक्षकांसाठी पूर्वीपेक्षा भव्यदिव्य व स्टायलिश ट्रीटमेंटने सज्ज होणार आहे. चित्रपटाच्या लेखनाचे काम अंतिम टप्प्यात असून, लवकरच कलाकार आणि तंत्रज्ञांची नावे जाहीर केली जाणार आहेत. दिग्दर्शक समित कक्कड यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगितले, ''हुप्पा हुय्या २' हा चित्रपट पहिल्या भागाप्रमाणेच प्रेक्षकांचे प्रेम आणि आशीर्वाद मिळवेल, असा विश्वास मला आहे. आम्ही हा सिक्वेल तितक्याच उत्कटतेने आणि भव्यदिव्य पद्धतीने साकारणार आहोत'. रानटी, हाफ तिकीट, धारावी बँक, इंदोरी इश्क, आयना का बायना, आश्चर्यचकीत, ३६ गुण या सारख्या वैविध्यपूर्ण चित्रपटांचे दिग्दर्शन करणाऱ्या समित कक्कड यांच्यासारखा सिनेमाच्या तंत्रावर पकड असलेला दिग्दर्शक याही चित्रपटाला कलात्मकदृष्ट्या वेगळ्या उंचीवर नेईल यात शंका नाही. समित कक्कड फिल्म्स प्रस्तुत 'हुप्पा हुय्या २' ची निर्मिती अमर कक्कड, पुष्पा कक्कड आणि समित कक्कड हे करीत असून, संगीत-दिग्दर्शन अजित परब यांचे तर लेखन हृषिकेश कोळी यांचे आहे. 'संकटात धैर्य, संघर्षात साहस आणि विजयात विनम्रता शिका' अशी मारुतीरायाची शिकवण मानणाऱ्या 'हुप्पा हुय्या २'च्या घोषणेनंतर या चित्रपटाची उत्सुकता प्रेक्षकांना आहे.

# संत मुक्ताईंच्या जीवनावर येणार चित्रपट




मराठी सिनेसृष्टीतून सध्या नवनवीन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. वेगळे कथानक असलेले, अनेकविध विषयांवर आधारित चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. आता लवकरच संत मुक्ताबाईच्या आयुष्यावर आधारित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई'हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रेश्मा कुंदन थडानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून चित्रपटाची प्रस्तुती ए.ए.फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे.

सोशल मीडियावर नुकतेच संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले आहे. हा चित्रपट १८ एप्रिल २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या पोस्टरमध्ये संत 'मुक्ताई' विठ्ठलाची आराधना करताना दिसते आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन दिग्पाल लांजेकरने केले आहे. या चित्रपटाबद्दल बोलताना दिग्पाल लांजेकर यांनी म्हटले की, देहरूपाने संपले तरी कार्यरूपाने संजीवन असणार्या मुक्ताबाईंच्या कार्य व विचारांना जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी मुक्ताईने निभावलेल्या माता, भगिनी, गुरु अशा विविध भूमिकांचे पदर 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटातून उलगडणार आहेत. स्त्री-पुरुष भेदापलीकडे जगणे शिकविणार्या संत मुक्ताईंचा खडतर आणि भक्तिरसाने परिपूर्ण जीवनप्रवास आजच्या पिढीला माहीत व्हावा यासाठी 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटात दिसणार आहे. चित्रपटातील संगीताची जबाबदारी अवधूत गांधी, देवदत्त बाजी यांनी सांभाळली आहे. छायांकन संदीप शिंदे तर संकलन सागर शिंदे, विनय शिंदे यांचे आहे. कला दिग्दर्शन प्रतीक रेडीज, तर ड्रोन आणि स्थिर छायाचित्रण प्रथमेश अवसरे यांनी केले आहे. रंगभूषेची जबाबदारी अतुल मस्के, तर वेशभूषेची जबाबदारी सौरभ कांबळे यांनी सांभाळली आहे. नृत्य दिग्दर्शन किरण बोरकर, तर ध्वनी आरेखन निखिल लांजेकर यांचे आहे. पार्श्वसंगीत शंतनू पांडे यांनी दिले आहे. साहसदृश्ये बब्बू खन्ना यांची आहेत. सहनिर्माते सनी बक्षी आहेत. केतकी गद्रे अभ्यंकर कार्यकारी निर्मात्या आहेत. दरम्यान, 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. यांनी केलं आहे, तर अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. आता हाच चित्रपट संपूर्णपणे मराठी भाषेत प्रेक्षकांना अल्ट्रा झकास या मराठमोळ्या ओटीटीवर पाहता येत आहे. 'अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट'ची निर्मिती असलेल्या 'जननी' या बहुचर्चित चित्रपटाविषयी बोलताना अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंटचे एमडी आणि सीईओ सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले कलाकारांची उत्तम फळी लाभलेला हा चित्रपट मराठी भाषेत प्रेक्षकांच्या भेटीला आणताना आम्हाला आनंद होत आहे. तत्कालीन परिस्थितीत सरोगसी सारख्या विषयावर प्रकाश टाकणारा विषय आम्ही 'जननी' चित्रपटात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'अल्ट्रा झकास मराठी ओटीटी'च्या माध्यमातून हा चित्रपट जगाच्या कानाकोपऱ्यात जात आहे.

# स्वतःला मराठीपुरतं मर्यादित ठेवलं आहेस का?



मराठी मराठमोळी अभिनेत्री तेजश्री प्रधान 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत दिसत होती. मात्र अचानक तिने मालिकेतून एक्झिट घेतली. यामागचं कारण अजूनही गुलदस्त्यातच आहे. दुसरीकडे तेजश्री 'हॅशटॅग तदैव लग्नम' सिनेमातही झळकली. मात्र तेजश्री हिंदीत फारशी दिसत नाही. तिने स्वतःला मराठीपुरतं सीमित ठेवलं आहे का असा प्रश्न तिला विचारला असता तिने काय उत्तर दिलं वाचा. 'मुक्काम पोस्ट मनोरंजन'ला दिलेल्या मुलाखतीत तेजश्री प्रधान म्हणाली, माझ्या घरात अवॉर्ड्स ठेवलेल्या शेल्फमध्ये एक जागा रिकामी आहे. तिथे एक लाईट लावला आहे. जेव्हा मला अवॉर्ड मिळतो मी ते तिथे ठेवते तेव्हा मला ती रिकामी जागा दिसते. ती जागा मला सांगते की अजून खूप काही बाकी आहे. मी प्रत्येक वेळी ती जागा तशीच रिकामी ठेवते. देव करो कधीतरी आयुष्यात मला ऑस्कर मिळो. पण कदाचित तो ऑस्करही मी त्या रिकाम्या जागेत ठेवू शकणार नाही. कारण तुम्ही अर्धवट राहता किंवा काहीतरी बाकी आहे असं वाटतं तेव्हाच तुम्ही रोज उठता आणि काम करता. आपण परफेक्ट आहोत हेच मानलं तर मग पुढे प्रगतीला काही स्कोपच राहत नाही. हिंदीत काम करण्याविषयी तेजश्री म्हणाली, मी स्वतःला मराठीपुरतं सीमित ठेवलेलं नाही. मी २ हिंदी सिनेमे केले ज्यात मी मुख्य अभिनेत्री आहे. मी एक हिंदी नाटकही केलं. मी सीमित ठेवलेले नाही फक्त काही सीमारेषा आखलेल्या आहेत. त्याच्यापलीकडे जाऊन काम करावंसं वाटत नाही. जे माध्यम आपल्याला बोलवतं त्याकडे कधीच पाठ फिरवायची नाही असं मला वाटतं. जेव्हा मला हिंदीतून चांगली संधी येईल तेव्हा मी तेही करेल. तेजश्री या वर्षी काही चांगल्या प्रोजेक्ट्समध्येही दिसणार आहे. याबद्दल तिने अधिक माहिती दिलेली नाही. मात्र लवकरच ती वेगळ्या भूमिकेत दिसेल असा तिने मुलाखतीत खुलासा केला आहे.



# सगळे मर्दानगी दाखवणारे सिनेमे करत होते अन् मी...

सायली दाक्षिणात्य अभिनेता सिद्धार्थ अनेकदा वेगवेगळ्या विषयांवर मत मांडत असतो. आपल्या बेधडक वक्तव्यांमुळे तो चर्चेत असतो. नुकतंच हैदराबाद साहित्य महोत्सवात त्याने हजेरी लावली. यावेळी त्याने त्याच्या कारकिर्दीविषयी भाष्य केलं. सिनेमातील टॉक्सिक भूमिकांच्या ऑफर अनेकदा नाकारल्याचा खुलासा त्याने केला. नकार देणं अनेकदा आव्हानात्मक होतं पण त्याला यामुळे समाधान मिळालं असंही तो म्हणाला. अभिनेता सिद्धार्थने हैदराबाद साहित्य महोत्सवात प्रसिद्ध गायिका आणि लेखिका विद्या राव यांच्यासोबत संवाद साधला. विद्या राव या आदिती राव हैदरीची आई आहे त्यामुळे नात्याने सिद्धार्थच्या सासू आहेत. या चर्चेत दोघांनी सिनेमाच्या अनेक पैलूंवर संवाद साधला. सिद्धार्थ म्हणाला, मला अनेकदा अशा स्क्रीप्ट मिळाल्या आहेत ज्यात मला महिलांच्या कानाखाली मारायची असते, आयटम साँग असतं, कोणाच्या बेंबीवर चुटकी मारायची, एखाद्या महिलेला तिने काय करावं, कुठे जावं कुठे नाही हे सांगायचं इत्यादि. अशा भूमिका मी लगेच नाकारल्या आहेत. माझ्या आसपास अनेकजण आक्रमक आणि मर्दानगी दाखवणार्या भूमिका करत होते. अशा वेळी जेव्हा लोक 'मर्द को दर्द नही होता' सारख्या गोष्टी बोलत होते तेव्हा मला मी मात्र स्क्रीनवर रडण्यात आनंदी होतो. सिद्धार्थ नुकताच 'मिस यू' या तमिळ सिनेमात दिसला. आता त्याचा आगामी 'द टेस्ट' रिलीज होणार आहे. यामध्ये नयनतारा आणि आर माधवनही आहे. शिवाय त्याचा 'इंडियन ३' ही रिलीज होणार आहे. गेल्या वर्षीच सिद्धार्थने अदिती राव हैदरीसोबत लग्नगाठ बांधली.

# 'वास्तव'चा २६ वर्षांनी येणार सिक्वेल?



१९९९ मध्ये संजय दत्त आणि महेश मांजरेकर यांनी 'वास्तव: द रिॲलिटी' या गँगस्टरवर आधारित सिनेमासाठी एकत्र काम केले होते, हा चित्रपट खूप यशस्वी ठरला होता. यातील संजय दत्तची रघू ही भूमिका, त्याचा पचास तोला हा डायलॉग तसेच संजय नार्वेकर यांची देडफुट्याही भूमिका आणि सिनेमाची दमदार कथा त्यामुळे हा सिनेमा गाजला. 'वास्तव' भारतीय सिनेमातील पहिला गँगस्टर चित्रपट म्हणून ओळखला जातो. आता २६ वर्षांनंतर महेश मांजरेकर 'वास्तव'चा सिक्वेल तयार करणार आहेत.

महेश मांजरेकर यांनी 'वास्तव'च्या सिक्वेलसाठी एक खास कल्पना तयार केली आहे. हा सिक्वेल म्हणजे मूळ कथेचा पुढचा भाग नसून याच फ्रँचायझीचा एक नवीन चित्रपट आहे. महेश यांनी 'वास्तव'च्या दुनियेच्या अनुरूप एक कल्पना साकारली असून, ती त्यांनी संजय दत्तबरोबर शेअर केली आहे. संजय दत्त या कल्पनेमुळे खूप उत्साही झाला आहे. महेश सध्या या कल्पनेला संपूर्ण पटकथेत विकसित करण्याचे काम करत आहेत, तर संजय त्याची पूर्ण कथा ऐकण्यासाठी उत्सुक आहे. सूत्रांनी असेही म्हटले की, 'वास्तव २' हा भारतीय सिनेमातील सर्वात मोठ्या गँगस्टर चित्रपटांपैकी एक ठरेल. जर पटकथा योग्य पद्धतीने साकारली गेली, तर निर्माते या चित्रपटासाठी एका लिस्ट तरुण नायकाला घेण्याचा विचार करत आहेत. २०२५ च्या मध्यापर्यंत कास्टिंगबाबत स्पष्टता येईल. सध्या महेश आणि त्यांची लेखकांची टीम या पटकथेवर काम करत आहेत आणि हा चित्रपट मोठ्या प्रमाणावर संवादांनी भरलेला एक हाय-ॲक्टेन गँगस्टर ड्रामा बनवण्याचे प्रयत्न करत आहेत, असे सूत्राने स्पष्ट केले.

# औरंगजेबच्या भूमिकेत दिसणार बॉबी देओल



अभिनेता बॉबी देओलने नुकताच त्याचा ५६ वा वाढदिवस साजरा केला. वाढदिवसाच्या निमित्ताने त्याच्या नवीन चित्रपटातील लूक समोर आला आहे. बॉबी देओल 'हरि हर वीरा मल्लू' या तेलुगु चित्रपटात भूमिका साकारणार असून, या सिनेमातील त्याचा लूक समोर आला आहे. एकेकाळी बॉक्स ऑफिसवरून गायब झालेल्या बॉबी देओलने मागील काही वर्षात दमदार कमबॅक केला आहे. मागील १-२ वर्षात बॉबीने रेस-३ मधून दमदार कमबॅक करत एकापेक्षा एक हिट दिले आहेत. बॉबी आश्रम, क्लास ऑफ ८३, रेस-३, लव हॉस्टेल, ॲनिमल आणि कंगुवा या चित्रपट-सीरिजमध्ये त्याने साकारलेल्या भूमिकांना प्रेक्षकांची दाद मिळाली आहे. आता बॉबी देओल लवकरच देओल 'हरि हर वीरा मल्लू' या चित्रपटात दिसणार आहे. बॉबीच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या चित्रपटाच्या निर्मात्यांनी त्याचा लूक शेअर केला आहे. या चित्रपटामध्ये तो ओरंगजेबची भूमिका साकारत आहे. 'हरि हर वीरा मल्लू' हा चित्रपट वेगवेगळ्या भागांमध्ये रिलीज होणार आहे. चित्रपटाच्या पहिल्या भागाला Sword rv Sirit असे नाव देण्यात आले आहे. हा चित्रपट तेलुगुसह विविध भाषांमध्ये रिलीज होईल. 'हरि हर वीरा मल्लू' हा चित्रपट २८ मार्चला मोठ्या पडद्यावर रिलीज होईल. या चित्रपटाचे दिग्दर्शक क्रिश जगरलामुडी हे असून, या चित्रपटात बॉबी देओलसोबत पवन कल्याण, निधी अग्रवाल, अनुपम खेर या कलाकारांचीही प्रमुख भूमिका आहे. तसेच, बॉबी देओल लवकरच हाऊसफुल-५ चित्रपटातही झळकणार असून, हा चित्रपट जून २०२५ मध्ये रिलीज होणार आहे.

# 'भूत बंगला' चित्रपटात दिसणार मराठमोळी अभिनेत्री

अभिनेता अक्षय कुमार 'भूत बंगला' या हॉरर कॉमेडी सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. २०२४ मध्ये सप्टेंबर महिन्यात त्याने पोस्टर शेअर करत या सिनेमाची घोषणा केली होती. मात्र निर्मात्यांनी अद्याप चित्रपटाची रिलीज डेट जाहीर केलेली नाही. मात्र या चित्रपटाबाबत एक अपडेट समोर आली आहे. या चित्रपटात मराठमोळी अभिनेत्री अक्षयसोबत पाहायला मिळणार आहे. अभिनेत्री मिथिला पालकर अक्षयबरोबर स्क्रीन शेअर करणार असून ती त्याच्या लहान बहिणीची भूमिका साकारणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार, २५ दिवस मिथिला या सिनेमाचं शूटिंग करणार आहे. 'भूत बंगला'मध्ये अक्षय कुमार, तब्बू, परेश रावल, राजपाल यादव, असरानी आणि वामिका गब्बी यांसारखे दिग्गज कलाकार प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. प्रियदर्शन या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळणार आहे. प्रियदर्शन आणि अक्षय कुमार यांनी 'हेरा फेरी', 'भूल भुलैया', 'गरम मसाला', 'भागम भाग' आणि 'खट्टा मीठा' यासारख्या हिट चित्रपटांची निर्मिती केली आहे. त्यानंतर आता 'भूत बंगला'साठी त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. 'भूत बंगला' चित्रपटाच्या भव्य सेट आणि सिनेमॅटोग्राफीवर देखील भर दिला जात आहे. काही रिपोर्ट्सच्या आधारे, हा चित्रपट एप्रिल २०२६ मध्ये प्रदर्शित होऊ शकतो. सध्या अक्षय कुमार सध्या 'स्कायफोर्स' चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत सारा अली खान आणि वीर पहाडिया देखील आहेत.



# 'छावा'मध्ये झळकणार नाना पाटेकरांच्या पत्नी



छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा येत्या १४ फेब्रुवारीला 'छावा' सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांना रुपेरी पडद्यावर पाहता येणार आहे. या सिनेमात विकी कौशल व दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना यांच्यासह अनेक मराठी कलाकार महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. काही दिवसांपूर्वीच 'छावा'चा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. यामध्ये अभिनेता संतोष जुवेकरची झलक दिसली होती. आता निर्मात्यांनी या सिनेमातल्या पहिल्या गाण्याचा टीझर सोशल मीडियावर शेअर केला आहे. 'छावा' सिनेमातल्या 'जाने तू' या गाण्याची पहिली झलक निर्मात्यांनी सोशल मीडियावर शेअर केली असून हे संपूर्ण गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. ए आर रेहमान यांनी या गाण्याच्या संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली असून, अरिजित सिंहच्या आवाजात हे गाणं संगीतबद्ध करण्यात आले आहे. 'जाने तू' गाण्यातील एका सीनमध्ये महाराणी येसूबाई छत्रपती संभाजी महाराजांचं औक्षण करत असल्याचं पाहायला मिळतं. यावेळी त्यांच्याबाजूला रयतेतील अनेक स्त्रिया स्वागतासाठी सज्ज असतात. यात रश्मिकाच्या बरोबर बाजूला आपल्याला नाना पाटेकरांच्या पत्नी नीलकांती पाटेकर उभ्या असल्याचं पाहायला मिळतंय. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा'मधून नीलकांती पाटेकर कलाविश्वात पुनरागमन करणार आहेत. गाण्याच्या टीझरमध्ये त्यांचा लूक पाहता त्या सिनेमात धाराऊंची भूमिका साकारणार असल्याचं समोर येत आहे. धाराऊ या शंभूराजेंच्या दूधआई होत्या. हीच महत्त्वाची भूमिका सिनेमात नीलकांती साकारणार आहेत. दरम्यान, दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर सुद्धा मराठीच आहेत. यापूर्वी त्यांनी विकी कौशलबरोबर 'जरा हटके जरा बचके' या सिनेमाच्यावेळी काम केलेलं होतं. लक्ष्मण उतेकर व विकी या दोघांचा 'छावा' हा एकत्र दुसरा सिनेमा आहे. आता १४ फेब्रुवारीला सिनेमा काय जादू करणार हे पाहणं महत्त्वाचं आहे.

# अल्लू अर्जुन घेऊन येतोय नवा चित्रपट

अल्लू अर्जुन हा चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्यांमध्ये गणला जातो. फक्त भारतात नाही तर जगभरात त्याचा बोलबाला आहे. अल्लू अर्जुनचा 'पुष्पा: द राइज' हा चित्रपट प्रचंड गाजला. त्यानंतर त्याचा दुसरा भाग 'पुष्पा २: द रुल'नं तर एक नवा इतिहासही रचला आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर तर झालाच, पण सोबतच भारतात सर्वांत जास्त कमाई करणारा सिनेमा ठरलाय. आता 'पुष्पा २: द रुल' अल्लू अर्जून एक सिनेमा घेऊन येत आहे. 'पुष्पा २: द रुल' च्या ऐतिहासिक यशानंतर अल्लू अर्जून कोणत्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार, याबद्दल चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. अल्लू अर्जून आता एक पौराणिक चित्रपट घेऊन येत आहे. चित्रपटाचे नाव अद्याप ठरलेलं नाही. पण, हा चित्रपट अल्लू अर्जूनचा २२ वा चित्रपट असल्यानं २२ म्हणून ओळखला जात आहे. दिग्दर्शक त्रिविक्रम श्रीनिवास यांच्यासोबत अल्लू अर्जूनने हात मिळवला आहे. हा या दोघांचा चौथा चित्रपट असणार आहे. याआधी, या हिट जोडीने 'JulêSi', 'एस/ओ सत्यमूर्ती' आणि 'अला वैकुंठपुरमुलू' मध्ये एकत्र काम केलं होतं. हा नवा चित्रपट देव मुरुगा (कार्तिकेय) यांच्या कथेवर आधारित असणार आहे. मुरुगा हे कार्तिकेय भगवानाचे एक नाव आहे. मुरुगाला युद्ध, धैर्य आणि संरक्षणाची देवता मानले जाते. त्यांची पूजा प्रामुख्याने दक्षिण भारतातील राज्यांमध्ये आणि विशेषतः तामिळनाडूमध्ये केली जाते. अल्लू अर्जूनच्या या चित्रपटाचे नाव 'गॉड ऑफ वॉर' असेही म्हटलं जात आहे. तथापि, या प्रकल्पाबाबत अल्लू अर्जुन किंवा त्रिविक्रम श्रीनिवास यांनी अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. चित्रपटातील उर्वरित कलाकार आणि क्रूबद्दल अद्याप कोणतीही पुष्टी नाही. त्रिविक्रम श्रीनिवास यांचा शेवटचा चित्रपट सुपरस्टार महेश बाबूसोबतचा 'गुंटूर कारम' होता. या चित्रपटात श्रीलीला मुख्य नायिका होती, जिने 'पुष्पा २' मध्ये 'किसिक' हे आयटम नंबर केलं होतं.



# प्रियांका चोप्रा तब्बल ८ वर्षांनी करणार पुनरागमन

अभिनेत्री प्रियांका चोप्रा हॉलीवूड सिनेमात काम करायला लागल्यापासून फार कमी वेळा बॉलीवूड सिनेमात दिसली आहे. प्रियांका चोप्रा विविध कार्यक्रमांसाठी भारतात येत असते आणि तेथील फोटो पोस्ट करत असते. असे असले तरी या 'देसी गर्ल'च्या चाहत्यांना तिला आता देशी सिनेमात पाहण्याची उत्सुकता लागली आहे. कारण प्रियांका चोप्रा 'जी ले जरा' या २०१९ साली आलेल्या हिंदी चित्रपटात शेवटची दिसली होती. गेली ५ वर्षे ती कुठल्याही हिंदी किंवा भारतीय सिनेमात दिसली नव्हती. मात्र, आता प्रियांका लवकरच भारतीय चित्रपटात पुरागमन करणार आहे. हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता असल्याने प्रियांका तब्बल ८ वर्षांनी भारतीय चित्रपटात पुनरागमन करणार आहे. प्रियांका चोप्रा दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील दिग्दर्शक एस एस राजामौली यांच्या चित्रपटातून पुनरागमन करणार आहे. विशेष म्हणजे प्रियांकाने सिनेसृष्टीत दाक्षिणात्य चित्रपटातूनच पदार्पण केले होते. आता ती पुन्हा एकदा दाक्षिणात्य चित्रपटातून भारतीय सिनेसृष्टीत पुनरागमन करणार आहे. एसएस राजामौली यांच्या आगामी चित्रपट SSMB29 ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटात महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा मुख्य भूमिका साकारणार असून हा चित्रपट रोमान्स आणि थ्रिलरवर आधारित असेल, अशी अपेक्षा आहे. अलीकडेच राजामौली यांनी इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली, त्यात एका व्हिडीओने त्याने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. या व्हिडीओमध्ये एका सिंहाचा फोटो होता, यात राजामौली असून ते त्यांच्या हातात भारतीय पासपोर्ट होता. व्हिडीओमध्ये सिंहाचा फोटोवर पिंजरा येतो, राजामौली यांनी व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये लिहिले, कैद. राजामौली यांनी पोस्ट टाकल्यानंतर लगेचच प्रियांका चोप्रा आणि महेश बाबू यांनी त्यावर प्रतिक्रिया दिल्या. प्रियांका चोप्राने लिहिले, शेवटी, तर महेश बाबूने तेलुगूमध्ये कमेंट केली, ओक्कसारी कमिट आयथे ना माटा नेने विनानु (एकदा मी कमिटमेंट केली की मी फक्त फक्त माझंच ऐकतो). प्रियंकाच्या या सिनेमाची प्रेक्षक वाट पाहत आहेत.



विधू विनोद चोप्रा यांच्या '१२ वी फेल' सिनेमाने बॉक्सऑफिसवर धुमाकूळ घातला होता. या सिनेमात विक्रांत मेस्सीने मुख्य भूमिका साकारली. विक्रांतचा परफॉर्मन्स सर्वांनाच आवडला. शिवाय त्याला अभिनेत्री मेधा शंकरनेही उत्तम साथ दिली. तिचाही निरागस अभिनय वाखणण्याजोगा होता. '१२ वी फेल' च्या यशानंतर आता मेधा शंकर पुन्हा

# 'या' अभिनेत्यासोबत कॉमेडी भूमिकेत दिसणार मेधा शंकर

कोणत्या सिनेमात दिसणार माहितीये का? अभिनेत्री मेधा शंकर आता जासूसी कॉमेडी सिनेमात दिसणार आहे. तिच्यासोबत अभिनेता सनी कौशल आणि निम्रत कौर असणार आहेत. सिनेमाचं शूट सध्या राजस्थानमध्ये सुरु आहे. अद्याप सिनेमाचं टायटल ठरलेलं नाही. लक्ष्मण उतेकर आणि टीसीरिज सिनेमाची निर्मिती करणार आहेत. सिनेमातून सनी, मेधा आणि निम्रत पहिल्यांदाच एकत्र येत आहे. मेधाला पुन्हा वेगळ्या भूमिकेत पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. सनी कौशल नुकताच 'फिर आयी हसीन दिलरुबा' सिनेमात दिसला. त्याच्या भूमिकेचं खूप कौतुक झालं. तापसी आणि विक्रांत मेस्सीसोबत त्याचीही महत्वाची भूमिका होती. तर निम्रता कौर 'सजनी शिंदे का व्हायरल व्हिडिओ' मध्ये दिसली होती. आता ती 'सेक्शन ८४' मध्येही झळकणार आहे. यामध्ये अमिताभ बच्चन आणि डायना पेंटी मुख्य भूमिकेत आहेत. शिवाय ती अक्षय कुमार, वीर पहाडिया आणि सारा अली खान यांच्यासोबत 'स्काय फोर्स' मध्ये दिसणार आहे.



# ...तेव्हा मी आत्मसन्मान गमावला

प्रत्येक व्यक्ती प्रेमात पडते. प्रेमात पडल्यावर सर्व काही छान वाटतं. मात्र, हेच प्रेम जेव्हा आपली साथ सोडतं तेव्हा काळीज पूर्णत: तुटतं. बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूर लग्नाआधी बॉलीवूडची बेबो करीना कपूरच्या प्रेमात होता, अशी चर्चा होती. त्यानंतर या दोघांच्या ब्रेकअपच्याही चर्चा झाल्या. त्यानंतरही शाहिदचं नाव सिनेविश्वातील काही अभिनेत्रींशी जोडलं गेलं. मात्र, त्यानं मिरा राजपूतबरोबर विवाह करून, अफेअरबाबतच्या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला. अशात आता शाहिदने ब्रेकअप या विषयावर आपलं मत व्यक्त केलं आहे. एका मुलाखतीमध्ये शाहिदने त्याच्या लग्नाआधीच्या नात्यांवर वक्तव्य केलं आहे. या मुलाखतीत त्याला जेव्हा प्रेमात हृदय तुटतं तेव्हा कसं वाटतं, असं विचारण्यात आलं होतं. त्यावर शाहिद म्हणाला, जेव्हा तुम्ही खऱ्या अर्थानं एखाद्यावर प्रेम करता आणि ती व्यक्ती अचानक तुमच्यापासून दूर जाते, तेव्हा स्वत:चा आत्मसन्मान गमावेपर्यंत तुम्ही त्या व्यक्तीची वाट पाहता. असे करताना तुम्हाला हेही लक्षात येत नाही की, यात तुम्ही तुमची प्रतिष्ठासुद्धा गमावत आहात. या सर्व गोष्टींची जाणीव फार उशिरा होते आणि तेव्हा तुम्ही विचार करता की, अरे, मी हे काय करत होतो. अशा घटनांमधून प्रत्येक व्यक्ती काही ना काही शिकत असतो. त्यामुळे शाहिदला मुलाखतीमध्ये तू यातून काय शिकलास, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर शाहिद म्हणाला, प्रेमात ब्रेकअपनंतर हृदय तुटल्यावर तुम्हाला हे समजतं की, तुम्ही कोणत्या प्रकारच्या व्यक्तीला किती मर्यादेपर्यंत सहन करू शकता. शाहिद कपूर पुढे म्हणाला, प्रेमात पडणं वाईट नाही. मात्र, यानं तुमच्या आयुष्यात किती चांगल्या आणि वाईट गोष्टी घडतात याकडे तुम्ही स्वत: लक्ष दिलं पाहिजे. मी प्रेमातून असं शिकलो की, एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीची गरज असू नये. कारण- मला त्या व्यक्तीची गरज आहे हे प्रेम मिळविण्याचं सर्वांत स्वार्थी कारण आहे. शाहिद कपूरने पुढे नात्यात दुरावा केव्हा येतो याचीही माहिती सांगितली आहे.

